"गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" योजनेंतर्गत धरणातील गाळ उपसा करून शेतात पसरविण्याकरिता तसेच पाझरतलाव, गावतलाव यांच्या बुडीत क्षेत्रातील गाळ काढून त्याच तलावाच्या पुनरुज्जीवनाकरिता काढण्यात आलेल्या गाळ/माती या गौण खनिजास स्वामित्वधनातून सूट देणेबाबत.---------------

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : गौखनि-२९/०६१७/प्र.क्र.२७३/ख
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १० ऑक्टोबर, २०१७.

<u>वाचा</u> -:१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. गौखनि-१०/०५१०/प्र.क्र. २१५/ख, दि. ३ नोव्हेंबर, २०१०.

२) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. गामुध-२०१७/प्र.क्र. १३४/जल-१ दि. ६ मे, २०१७. १

<u>प्रस्तावना</u>-:

राज्यातील धरणांमध्ये साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत घट होत असल्याने सदर गाळ उपसा करून शेतात पसरविल्यास धरणांची मूळ साठवण क्षमता पुन:स्थापित होऊन कृषि उत्पन्नात देखील भरीव वाढ होणार आहे. ही बाब विचारात घेऊन राज्यातील धरणांमधील गाळ काढून (मागेल त्याला गाळ) तो शेतात पसरविण्यासाठी "गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" योजना राबविण्याच्या ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या प्रस्तावास राज्य मंत्रीमंडळाने दि. २.५.२०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली असून या मान्यतेच्या अनुषंगाने ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या संदर्भीय शासन निर्णय दि. ६.५.२०१७ अन्वये याबाबतचे धोरण आणि कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

"गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" या योजनेंतर्गत गाळ काढून तो शेतात पसरविण्याकरिता स्वामित्वधन व अर्ज फी मधून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्याचप्रमाणे पाझरतलाव व गावतलाव यांची साठवणूकक्षमता वाढविण्याकरिता त्यांच्या बुडीत क्षेत्रातील गाळ काढून त्यांची दुरूस्ती/पुनरुज्जीवन करणे आवश्यक असल्याने, पाझरतलाव व गावतलाव यांच्या पुनरुज्जीवनाकरीता त्यांच्या बुडीत क्षेत्रातील गाळ काढून तो त्याच तलावाच्या पुनरुज्जीवनाकरिता वापरण्यास स्वामित्वधनातून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

"गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार" या योजनेंतर्गत धरणांमधील गाळ/माती काढून ती शेतात पसरविण्याकरिता तसेच पाझरतलाव व गावतलाव यांच्या पुनरुज्जीवनाकरीता त्यांच्या बुडीत क्षेत्रातील गाळ काढून तो त्याच तलावाच्या पुनरुज्जीवनाकरिता वापरल्या जाणाऱ्या गाळ/माती करिता स्वामित्वधन तसेच अर्ज फी मधून या शासन निर्णयान्वये सूट देण्यात येत आहे. सदरहू सवलत धरणातून/तलावातून उत्खनन करण्यात येणाऱ्या अन्य गौण खनिजांना लागू होणार नाही."

३. अशा प्रकरणी शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. गौखनि १०/०५१०/प्र.क्र. २१५/ख, दि. ३.११.२०१० व शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. गामुध-२०१७/प्र.क्र. १३४/जल-१ दि. ६.५.२०१७ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २६६/२०१७/व्यय-९, दिनांक १०.०८.२०१७ अनुसार दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१११३५३३८००१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6d826b10ad447a82c4c6b08bdc2d2b99f22e6cf7231a8d19a6130cb67fc0742e, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2017.10.11 13:42:10 +05'30'

**(दिनेश चव्हाण)**
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

**प्रत :**

१) सर्व मंत्रालयीन विभाग,
२) सर्व विभागीय आयुक्त,
३) सर्व जिल्हाधिकारी,
४) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
५) सर्व जिल्हा खनिकर्म अधिकारी.
६) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०.
७) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, प्रतिष्ठा भवन, १०१, महर्षि कर्वे भवन, न्यू मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०
८) प्रधान महालेखापाल -२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
९) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, जल-१ कार्यासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
११) वित्त विभाग, (व्यय-९/ अर्थसंकल्प -३/१४) मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१२) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
१३) निवडनस्ती “ख” कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.